२०५

मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
कोंकण भवन,सहावा मजला,
नवी मुंबई-४०० ६१४.

कार्यालयीन आदेश क्रमांक : १२ दिनांक : ८ /४/२००२. 8 एप्रैल APR 2002

**विषय :- जवाहर ग्रामसमृध्दी योजनेच्या लेखापरीक्षणाचा आढावा.**

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र. स्था.१८/ब/सभा/एएसए/३२६
दि.२८ मार्च २००२.

दि.७/३/२००२ रोजी कोंकण भवन,नवी मुंबई येथे आयोजित केलेल्या स्थानिक निधी लेखा विभागाच्या बैठकीत जवाहर ग्रामसमृध्दी योजनेच्या लेखा परीक्षण संदर्भात खालील प्रमाणे निर्णय घेण्यांत आला आहे

१) ग्रामसमृध्दी योजनेचे लेखा परीक्षणाबाबत प्रगती दर्शविणारे मासिक,त्रैमासिक अहवाल ग्रामनिधी आणि जवाहर रोजगार योजनेच्या विवरणाप्रमाणे स्वतंत्रपणे या कार्यालयास पाठवावेत.

२) ग्रामसमृध्दी योजनेचे लेखा परीक्षण जवाहर रोजगार योजनेसाठी ठरवून दिलेल्या निकषानुसार आणि त्यासाठी असलेल्या सुधारीत अटीप्रमाणे करण्यात यावे.

३) या योजनेचा लेखा परीक्षण अहवाल स्वतंत्रपणे निर्गमित करावा.

तरी यापुढे मासिक,त्रैमासिक अहवाल पाठवितांना वर दर्शविलेल्या सुचनांचे पालन करणेत यावे.

८/४/०२

( सी.जी.पवार.)
मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
म.रा. नवी मुंबई.

प्रत माहितीसाठी तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१. उपमुख्य लेखा परीक्षक(वरिष्ठ),स्थानिक निधी लेखा,
उपमुख्य लेखा परीक्षक,स्थानिक निधी लेखा, (सर्व जिल्हे)
२. उपमुख्य लेखा परीक्षक(पं.रा.स.) स्थानिक निधी लेखा,मुंबई.
३. सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी, (अहवाल/परास)
४. अभिलेखापाल ( २ प्रती)